


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २४५ वा सोमवार दि २४ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# शिवसेनेपुढं कुणाची दहशत चालत नाही; भाजपविरोधात शिंदे सेना आक्रमक, मंत्र्याने दिला थेट इशारा

**वृत्तसंस्था/सातारा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील दुराव्याच्या चर्चांना दोघांनीही स्पष्टीकरण दिल्यानंतर, पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी भाजपला थेट आव्हान दिले आहे. फलटणमध्ये शिवसेना उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ करताना, देसाई यांनी भाजपला डिवचले. शिवसेनेपुढे कोणाचीही दहशत चालणार नाही. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात नागरिकांना निर्भयपणे जगता येईल असे वातावरण निर्माण करू, असे वक्तव्य त्यांनी केले. शिवसेना, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आणि कृष्णा-भिमा विकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ रविवारी झाला. यावेळी बोलताना शंभूराज देसाई म्हणाले की, फलटणमध्ये दहशतीचे वातावरण असल्याची चर्चा आहे, पण शिवसेनेपुढे कोणाचीही दहशत चालणार नाही. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात फलटण शहरातील नागरिकांना निर्भयपणे जगता यावे, असे वातावरण आपण निर्माण करू. एकनाथ शिंदे यांच्या नावाला साजेसा दणदणीत विजय मिळवायचा आहे. त्यासाठी मी तुमच्या पाठीशी ठामपणे उभा आहे, असे शंभूराज देसाई म्हणाले आहेत. शंभूराज देसाई यांनी पुढे सांगितले की, फलटणच्या राजे परिवाराने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात काम करण्याचा निर्णय घेतल्याचा आम्हाला आनंद आहे. राजे गटाला डावपेच सांगण्याची गरज नाही. लोकांची सेवा करण्याची परंपरा या कुटुंबाला आहे. एकनाथ शिंदे हे जिवाला जीव देणारे नेते आहेत. २८ तारखेला ते फलटणला येणार आहेत. त्यांच्यारुपाने राज्याचे नगरविकास खातेच फलटणला येणार आहे. महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात ज्यांचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या सहभागी असेल, त्याच्यावर कडक कारवाई होईल, असा इशाराही त्यांनी नाव न घेता दिला. माजी आमदार दीपक चव्हाण यांनी सांगितले की, फलटण शहर एक नामांकित आणि सुसंस्कृत शहर आहे. रामराजेंनी फलटण तालुक्याला विकासाची दिशा दिली आहे. ते फलटणच्या विकासाचे मास्टरमाईंड आहेत. फलटण शहर आणि तालुक्याच्या विकासासाठी आपण सर्व शिवसेनेत आलो आहोत. इथली दहशत संपवायची आहे, असेही वक्तव्य शंभूराज देसाईंनी केलं. रघुनाथराजे नाईक निंबाळकर यांनी ग्वाही दिली की, सातारा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष शिवसेना ठरवेल. खंबाटकी घाटाच्या अलिकडचा संपूर्ण भाग आम्ही भगवा करुन दाखवू. कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना आता समूळ नष्ट होईल. आपण प्रामाणिकपणे शिवसेनेचे काम करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. संजीवराजे नाईक-निंबाळकर म्हणाले की, फलटण शहर व तालुक्याला योग्य दिशेने नेण्यासाठी शिवसेनेमध्ये जाण्याचा निर्णय झाला आहे. सर्वसामान्यांची कामे व्हावीत, त्यांना आधार व संरक्षण मिळावे, म्हणून आपण सर्वांनी हा निर्णय घेतला आहे. आता जे काही बरे वाईट होईल ते शिवसेनेतच होईल. हा आपला अंतिम निर्णय आहे. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अनिकेतराजे नाईक-निंबाळकर यांनी सांगितले की, आपण शिवसेनेत प्रवेश केल्यामुळे फलटणमधील भीतीचे वातावरण दूर होणार आहे. त्यांनी शासकीय यंत्रणांचा गैरवापर होत असल्याकडे शंभूराज देसाई यांचे लक्ष वेधले. तसेच फलटणच्या विकासासाठी पालिकेच्या माध्यमातून सर्वतोपरी काम करण्याची ग्वाही त्यांनी दिली.





# बुलढाणा नगर परिषद निवडणूक डॉक्टरांचा रोष-भाजपाची ठाम गर्जना!

**जनसंचलन/बुलढाणा**

शहरात आज राजे गार्डन येथे झालेल्या डॉक्टरांशी संवाद बैठकीत प्रचंड संतापाची ठिणगी पेटली! भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व रिपाई (आठवले गट) यांच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार अर्पिताताई विजयराज शिंदे तसेच मित्र पक्षाच्या उमेदवारांच्या उपस्थितीत नगर परिषदेच्या भोंगळ, बेजबाबदार आणि जनतेला त्रास देणाऱ्या कारभारावर जोरदार हल्ला चढवण्यात आला. इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. अजित शिरसाठ यांनी नगरपरिषदेवर थेट आरोपांचा पाऊस पाडत शहरातील आरोग्यविषयक अडचणी, अस्वच्छता, पाणीपुरवठ्याची दुर्दशा, दवाखान्यांभोवतीचे कचऱ्याचे साम्राज्य, अनियमित प्रशासन आणि उदासीनतेवर कडाडून आवाज उठवला. रुग्णसेवा करताना डॉक्टरांना त्रास, नागरिकांचे हाल आणि नगरपरिषदेचा ठप्प व भ्रष्ट कारभारे आम्ही किती दिवस सहन करायचे? असा धगधगता सवाल त्यांनी ऐकायला लावला. यानंतर वातावरण आणखी तंग झाले, जेव्हा भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी व्यासपीठावरून नगरपरिषदेच्या अकार्यक्षमता आणि दुर्लक्ष करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना थेट इशारा दिला. डॉक्टरांनी मांडलेल्या सर्व प्रश्नांना गंभीरतेने घेत, आगामी काळात भाजप सरकार आणि आम्ही स्वतः या सर्व समस्या मुळापासून उखडून काढू! सुरक्षित, सुव्यवस्थित आणि भयमुक्त बुलढाणा हे आम्ही देऊफक्त सत्ता बदल हाच एकमेव उपाय! अशी ठाम ग्वाही दिली. बैठकीत उपस्थित डॉक्टरांनी भाजपा नेतृत्वाच्या भूमिकेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत बदलाची हाक पुन्हा बुलंद केली. नगरपरिषदेच्या कारभाराविरोधातील ही तीव्र नाराजी आता निवडणूक रणधुमाळीत मोठा भूकंप घडवणार,अशी चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. बुलढाण्यात सत्ता बदलाची लाट डॉक्टरांचा आक्रोश, भाजपाची आक्रमक हाक!





दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ...मराठवाड्याची दखल...



## संपादकीय लेख

दक्षिण मध्य रेल्वेचे शेवटचे टोक असलेल्या नांदेड विभागातील छत्रपती संभाजीनगर ते परभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाला केंद्र सरकारने मंजुरी दिली. १७७.२९ किलोमीटरच्या मार्गासाठी २ हजार १७९ कोटी रुपये निधीची घोषणाही झाली. ब्रॉडगेज, रेल्वेगाड्यांचा विस्तार, स्थानकांमध्ये सुविधांच्या पूर्ततेसाठी मराठवाड्यातील जनतेने आंदोलनांच्या अनेक लढाया लढल्या. कित्येक वर्षे छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड; तसेच हिंगोली या पाच जिल्ह्यांना रेल्वेसुविधेचा लाभ मिळत होता. लातूर, धाराशिव व बीड गेल्या काही वर्षांत जोडले गेले. मात्र, रेल्वे मार्गाची एकल लाइन पुढच्या सुविधा मिळण्यासाठी अपुरी होती. परभणी - मुदखेड ८१ किलोमीटर रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण झाले आहे. अंकाई - छत्रपती संभाजीनगर मार्गाच्या दुहेरीकरणाचे काम सुरू आहे. २०२३ मध्ये या कामाला मंजुरी मिळून ९६० रुपयांचा निधी मंजूर केला होता. आता नव्या टप्प्याची मंजुरी मिळाली. दुहेरीकरणाचे प्रत्यक्ष लाभ टप्प्याटप्प्याने दिसायला लागतील. प्राथमिक टप्प्यात छत्रपती संभाजीनगर-मनमाड दुहेरीकरणामुळे मुंबईच्या प्रवासाच्या वेळेत एक तासाची बचत होईल. या मार्गावरील रेल्वेगाड्यांची संख्या वाढेल. सुविधांमध्ये वाढ होईल. प्रवासी, पर्यटनासाठी लाभ होईलच; शिवाय उद्योगांसाठी दुहेरीकरण लाभदायी ठरेल. मुंबईहून दक्षिणेतील विशाखापट्टणम टप्प्याकडे मराठवाड्यातून जाण्यासाठी नवा सुलभ पर्याय उपलब्ध होईल. मुदखेड-परभणी, अंकाई-छत्रपती संभाजीनगर असे दुहेरीकरणाचे दोन टप्पे होताना मधल्या टप्प्याला मंजुरी मिळावी, म्हणून परभणी-छत्रपती संभाजीनगर दुहेरीकरणासाठी प्रयत्न सुरू होता. या मंजुरीनंतर छत्रपती संभाजीनगर, जालना व परभणीत जमीन संपादनाची अधिसूचना दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने काढली आहे. त्यामुळे काम वेळेत पूर्ण होण्याची आशा आहे. पुढील काळात मुंबईहून हैदराबाद, विशाखापट्टणम, गुंटूरला पोहोचण्यासाठी हा मार्ग फायद्याचा ठरेल. मुदखेड ते बोलाराम (तेलंगण) दुहेरीकरण झाले तर मनमाड ते सिकंदराबाद दुहेरीकरण पूर्ण होईल. मुंबईतून दक्षिणेकडे जाणाऱ्या अनेक गाड्या या मार्गे जाऊ शकतात. भविष्यात मनमाड-सुरत गुजरातची दक्षिणेशी कनेक्टिव्हिटीफ होईल. अंकाई-छत्रपती संभाजीनगर-परभणी रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणामुळे गाड्यांची संख्या वाढेल. सध्या पन्नासपेक्षा अधिक रेल्वेगाड्या एकेरी मार्गावर धावतात.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# अहंकारामुळे रावणाची लंका जळून खाक

## नाराजीनाट्यानंतर शिंदेंचं डहाणूत मोठं वक्तव्य

**पालघर :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पालघर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. नगर पंचायत आणि नगर परिषद निवडणुकांच्या प्रचारासाठी त्यांची आज डहाणूत सभा पार पडली. यावेळी त्यांनी शिवसेनेचे डहाणू नगर परिषदेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजू माछी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मतदान करण्याचं आवाहन केलं. एकनाथ शिंदे यांनी यावेळी आपण मुख्यमंत्री असताना काय-काय कामे केली, याबाबत भाष्य केलं. तसेच आपल्याकडे असणाऱ्या खात्यांच्या माध्यमातून डहाणूत कशाप्रकारे विकास करु? याबाबतही शिंदेंनी डहाणूकरांना आश्वासन दिलं. एकनाथ शिंदे यांनी यावेळी केलेल्या भाषणात त्यांचं एक वक्तव्य चर्चेला कारण ठरलं आहे. रावणाची लंका अहंकारामुळे जळून खाक झाली, असं वक्तव्य एकनाथ शिंदे यांनी केलं. त्यांच्या या वक्तव्यावरुन राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. विशेष म्हणजे त्यांच्या नाराजीनाट्यानंतर त्यांनी हे वक्तव्य केल्यामुळे त्यांनी भाजपवर तर टीका केली नाही ना? असा प्रश्न उपस्थित केला जातोय.तुमच्या एकनाथ शिंदेने फक्त ८० जागा लढवून विधानसभेच्या ६० जागा जिंकल्या. त्यामुळे मी आपल्याला एवढंच सांगतोय, आपल्याला खऱ्या अर्थाने या भागाचा विकास हवा असेल तर राजू माछी आणि त्यांच्या टीमला विजयी करायचं आहे. त्यामुळे हे २ तारखेचं पुण्याचं काम आपण केलं पाहिजे. बाकी तुम्ही एक दिवस मतदानासाठी काढा. मी सर्व कार्यकर्त्यांना सांगतोय, तुम्ही डोळ्यांत तेल घालून काम करा. सगळी कामे बाजूला ठेवा. विकास हे एकच नाव डोळ्यांसमोर ठेवा. तुम्हाला आयुष्यात चांगले दिवस आणायचे असतील तर इथे विकासाशिवाय पर्याय नाही', असं एकनाथ शिंदे म्हणाले.किनारपट्टीलगत असलेल्या मच्छिमारांची घरे नियमाकुल करण्याचा एक प्रश्न आहे. तो देखील निर्णय आम्ही घेणार आहोत. कारण नव्या म ुंबईतही आम्ही नियमाकुल करण्याचं काम एकनाथ शिंदेने केलं. मी तुम्हाला शब्द देतो, नगर विकास खातं तुमच्या एकनाथ शिंदेकडे आहे. पार्क मंजूर केल्याशिवाय राहणार नाही. १९८५ पासून इथे नगर परिषद अस्तित्वात आहे. पण आजतागत नगर परिषद भवन नाही. म्हणजे भाडावर आहे? बाकी लोकांचे बंगले मालकी हक्काचे आहेत. निवडणूक होताच नगर परिषद भवन बांधणार. जिंकून लोकांना न्याय मिळेल ते नगर परिषद भवन दिलं जाईल', असं आश्वासन एकनाथ शिंदेंनी दिलं.अरे लोकांना गार्डन पाहिजे, मुलांना खेळण्यासाठी मैदान पाहिजे. हे देण्याचं काम एकनाथ शिंदे केल्याशिवाय राहणार नाही. झेपीझाडांचं आधुनिकरण केलं जाईल. कारण शिक्षण महत्त्वाचं आहे. प्रत्येक विभागात क्लिनिक सुरु करु. मी मुंबईमध्ये प्रत्येक भागात बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना केला आहे. तसे दवाखाने डहाणूत सुद्धा चालू करु. सार्वजनिक विभाग आपल्याच मंत्र्याकडे आहे. प्रकाश आबिटकर यांच्याकडे आहे. त्यांनादेखील मी सूचना देत', असं एकनाथ शिंदे म्हणाले.तरुणांसाठी मल्टिस्पोर्ट ग्राऊंड आवश्यक आहे. तरुणांना जीवनाचा आनंद घेण्याचा अधिकार आहे. म्हणून हाऊसिंग डिपार्टम ेंट माझ्याकडे आहे. हाऊसिंगच्या माध्यम ातून, गृहनिर्माणच्या माध्यमातून प्रकल्प उभे केल्याशिवाय राहणार नाही असा मी आपल्याला शब्द देतो. प्रदूषणमुक्त उद्योग धोरण राबवून रोजगार निर्मिताला चालना देऊ. उद्योगमंत्री उदय सामंत यांना मी बैठक घेण्याचं बोललो आहे', असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.'मी आपल्याला एवढंच सांगतो, डहाणूत आपण सर्वजण एकत्र आलो आहोत. एकाधिकारशाहीच्या विरोधात एकत्र आलेला आहात. अहंकाराच्या विरोधात एकत्र आलेले आहात. रावणाचा अंहकार होता. पण रावणाची लंका अहंकारामुळे जळून खाक झाली. तुम्हाला २ तारखेला तेच करायचं आहे, असं मोठं वक्तव्य



एकनाथ शिंदे यांनी केलं. तुम्हाला भ्रष्टाचार संपवायचा आहे. या ठिकाणी विकासाला आणायचं आहे', असंदेखील शिंदे म्हणाले.जमिनीशी जोडलेला, अतिशय गरीब, मेहनती आणि गरिबांसाठी रात्र-दिवस उपलब्ध असलेला राजू मी तुम्हाला नगराध्यक्षपदाचा उमेदवार दिलेला आहे. त्यामुळे येत्या २ तारखेला राजू माछी यांची निशाणी धनुष्यबाण आणि त्यांचे सर्व सहकारी, त्यांचे ज्या ज्या निशाणी आहेत त्या सर्वांवर आपल्याला शिक्का मारायचा आहे', असं ते म्हणाले.

## राणे कुटुंबाचे मन दुखावू नका, एकनाथ शिंदेंचा आदेश', सामंत यांचा गौप्यस्फोट

**रायगड :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राणे कुटुंबियांना दुखवू नका, असे स्पष्ट आदेश एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत', अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. तसेच राणे कुटुंबाचे राजकीय महत्त्व कायम आहे', असं मंत्री उदय सामंत म्हणाले आहेत. रोहा येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होतेनिलेश राणेंना काही आक्षेप आहेत, ते तपासायलाच हवेत. तक्रार आम च्यासाठी गंभीर असते. चौकशी होईल आणि वस्तुस्थिती उघड होईल. आरोप खरे असतील तर संबंधितांवर कारवाई होईल. आम्ही कुणालाही पाठीशी घालणारे नाहीङ्घ, असं उदय सामंत म्हणाले.नारायण राणे हे केवळ भाजपचे वरिष्ठ नेते नाहीत, तर एकेकाळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री राहिले आहेत. रायगडसह कोकणातील त्यांच्या राजकीय वाटचालीचे महत्त्व आम्हाला पूर्णपणे ज्ञात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी स्वतः आम्हाला आदेश दिला



होता की, राणे कुटुंबाशी चर्चा करूनच कोणतीही राजकीय हालचाल करा आणि त्यांच्या मनाला धक्का पोहोचेल असे काहीही करू नका, असं उदय सामंत यांनी स्पष्ट केलं.दरम्यान, रायगड जिल्ह्यात सध्या शिवसेना-भाजप युती अनेक ठिकाणी झालेली असून, काही ठिकाणी राष्ट्रवादी अजित पवार गट युतीसोबत नसल्याबद्दलही सामंतांनी म ान्य केले. ङ्गजिथे परिस्थितीनुसार आम्ही स्वतंत्र लढत आहोत, तिथे आम्ही निश्चित विजयी होऊ, असा आत्मविश्वासही त्यांनी व्यक्त केला.राणे कुटुंबाविषयी कोणतीही नकारात्मक भावना आमच्या मनात नाही.

## का रे दुरावा? का रे अबोला? फडणवीस आणि शिंदे यांनी पुन्हा बोलणं टाळलं

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नाराजी अजूनही दूर झालेली नाही, असंच चित्र सध्या तरी दिसत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना भाजपमध्ये प्रवेश देण्यावर महायुतीत नाराजीनाट्य रंगलं आहे. शिवसेना मंत्र्यांनी विधानसभा निवडणुकीत ज्यांचा पराभव केला त्यापैकी अनेकांना भाजपने पक्षप्रवेश देत त्यांची ताकद वाढवल्याचा आरोप शिवसेनेकडून करण्यात आला आहे. शिवसेनेच्या मंत्र्यांनी मंगळवारी याच नाराजीतून राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार टाकला होता. केवळ एकनाथ शिंदे बैठकीत उपस्थित होते. यावेळी नाराजीवर तोडगा निघाल्याचं सांगितलं जात होतं.मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीनंतर वादावर पडदा पडला असं वाटत असताना एकनाथ शिंदे लगेच तडकाफडकी दिल्ली दौऱ्यावर गेले. त्यांनी दिल्लीत जावून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली. या चर्चेनंतर एकनाथ शिंदे यांची नाराजी दूर झाली असावी, असं वाटत असली तरी त्यांची नाराजी दूर करण्यात अद्याप तरी भाजपला पुरेसं यश आलेलं दिसत नाही. विशेष म्हणजे बिहार सरकारच्या शपथविधी सोहळ्यात शिंदे-फडणवीस यांच्यात अबोला दिसला. हुतात्मा दिनाच्या दिवशी आयोजित कार्यक्रमातही दोन्ही नेत्यांची देहबोली देखील दोघांमध्ये ठिक आहे, असं दर्शवणारी नव्हती. ऐरव्ही दोन्ही नेते



हसत-खेळत कार्यक्रमांमध्ये दिसायचे. पण या कार्यक्रमात दोन्ही नेत्यांमध्ये कोणताही संवाद झाला नाही.विशेष म्हणजे या सर्व नाराजीनाट्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज पुन्हा एकदा एका कार्यक्रमाच्या निमि त्ताने एकत्र आलेले बघायला मिळाले. देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या दिव्यज फाउंडेशनने आयोजित कार्यक्रमात दोन्ही नेते एकत्र आलेले बघायला मिळाले. पण या कार्यक्रमात एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात अबोला पुन्हा दिसला. विशेष म्हणजे एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात दोन खुर्च्यांचे अंतर दिसले. या कार्यक्रम ात दोन्ही नेत्यांनी एकमेकांसोबत संवाद करण्याचे टाळल्याचं बघायला मिळालं.

## उद्घाटनाची वाट बघू नका! शिंदेंच्या सूचना; एकनाथ भाई भाजपच्या लोढांची 'जागा' घेणार, मुहूर्त ठरला!

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना कामाला लागली आहे. मुंबईत महायुती एकत्र लढेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेकदा व्यक्त केला आहे. त्यानंतर शिंदे यांनी मुंबईत मोर्चेबांधणी सुरु केली आहे. एकनाथ शिंदे मुंबई महापालिकेच्या मुख्यालयातील भाजपच्या मंगल प्रभात लोढा यांच्या कार्यालयाची 'जागा' घेणार आहेत.मुंबई महापालिकेची निवडणूक जानेवारी २०२६ मध्ये होण्याची शक्यता आहे. शिंदे यांच्याकडे मुंबई शहरचं पालकमंत्रिपद आहे. शिंदे यांच्या आधी भाजपचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्याकडे मुंबई शहरचं पालकमंत्रिपद होतं. २०२२ च्या मध्यापासून ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत लोढा मुंबई शहरचे पालकमंत्री होते. त्यांनी २०२३ मध्ये मुंबई महापालिकेत कार्यालय सुरु केलं. ऑक्टोबर २०२४ मध्ये विधानसभेची निवडणूक झाली. तेव्हापासून लोढा यांचं मुंबई महापालिकेतील कार्यालय बंद आहे.लोढा यांच्यानंतर शिंदे यांच्यानंतर मुंबई शहरचं पालकमंत्रिपद आलं. त्यामुळे आता ते मुंबई महापालिकेतील लोढा यांनी वापरलेलं कार्यालय आपल्याकडे घेतील. शिंदे यांचे कर्मचारी या कार्यालयात बसतील आणि नागरिकांच्या समस्या ऐकून घेतील. त्या सोडवण्याचा प्रयत्न करतील. एकनाथ शिंदे यांच्या गैरहजेरीत या कार्यालयात



पक्षाचे पदाधिकारी बसणार नाहीत. शिवसेनेचे आमदार, खासदार या कार्यालयात आठवडाभर हजर असतील.सुत्रांच्या माहितीनुसार, शिंदे यांच्या कार्यालयाचं उद्घाटन २ डिसेंबरच्या आसपास होईल. सेनेचे माजी खासदार राहुल शेवाळे आणि वडाळ्याचे माजी नगरसेवक अमेय घोले यांनी मुंबई महापालिका मुख्यालयात येऊन कार्यालयाची पाहणी केली. कार्यालय लवकरात लवकर सुरु करण्याची सूचना शिंदे यांनी केल्याची माहिती पक्षातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी दिली.आम्ही कार्यालयाची पाहणी केलेली आहे. पुढील आठवड्यात कार्यालय सुरु करण्यात येईल. औपचारिक उद्घाटनाची वाट पाहू नका. लोकांच्या समस्या तातडीनं सोडवण्यास सुरुवात करा, अशा सूचना शिंदेजींनी केल्या आहेत,' अशी माहिती पदाधिकाऱ्यांनं दिली. कार्यालय लवकरात लवकर सुरु करुन लोकांच्या अडचणी दूर करण्यात येईल, असंही या पदाधिकाऱ्यानं सांगितलं.

# पुण्यातील डॉक्टरांचा प्रताप! महिलेची प्रसुती केली, पण टॉवेल पोटातच ठेवला; कुटुंबाचा आनंद क्षणात विरला

**पुणे :** पुण्यातील एका धक्कादायक प्रकरणात सीझेरियन प्रसूतीनंतर डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे एका महिलेच्या पोटात टॉवेल राहिला. यामुळे म हिलेला हृदयविकाराचा झटका आला आणि तीन वर्षे कोमात राहिल्यानंतर तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर तिच्या पतीने तब्बल चौदा वर्षे न्यायासाठी लढा दिला असून अखेर राज्य ग्राहक आयोगाने रुग्णालय व डॉक्टरांना वैद्यकीय निष्काळजीपणा आणि त्रुटीयुक्त सेवेसाठी जबाबदार धरलं आहे. तसंच रुग्णालय आणि डॉक्टरांना महिलेच्या पतीला २६ लाख ५० हजार रुपये भरपाई देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.याबाबतची सविस्तर माहिती अशी की, पाषाण येथील प्रशांत कुकडे यांनी सूस रस्त्यावरील जीवनदीप मेडिकेअर सेंटर आणि डॉक्टर दीपलक्ष्मी रगडे यांच्या विरोधात ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली होती. त्यांची पत्नी रूपाली यांना ८ ऑगस्ट २००८ रोजी



दुसऱ्या बाळाच्या प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. सीझेरियन शस्त्रक्रियेनंतर टाके घालताना डॉक्टरांच्या लक्षात आलं की, टॉवेल म हिलेच्या पोटातच राहिला आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा टाके उघडावे लागले.या प्रकारानंतर लगेचच रूपाली यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तातडीने दुसऱ्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे तीन दिवस उपचार घेतल्यानंतर त्यांना 'एन्सेफॅलोपॅथी' (मेंदूला सूज येणे) झाल्याने आणखी एका वेगळ्या रुग्णालयात हलवण्यात आलं. परंतु दुर्दैवाने त्या कोम ात गेल्या. तीन वर्षे कोमात राहिल्यानंतर १ मे २०११ रोजी त्यांचे दुर्दैवी निधन झालं.दरम्यान, २००८ मध्ये दाखल झालेल्या या तक्रारीवर तब्बल सतरा वर्षांनी निकाल लागला आहे. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या पुणे खंडपीठाचे अध्यक्षीय सदस्य मिलिंद सोनवणे आणि सदस्य नागेश कुंबरे यांनी हा निकाल दिला. या निकालाने शस्त्रक्रियेनंतर निष्काळजीपणा करणे, अत्यवस्थ रुग्णाला त्वरित उच्च-सुविधा केंद्रात न पाठवणे व तातडीने वैद्यकीय कागदपत्रे न देणे यांसारख्या ग्राहक सेवेतील त्रुटी आणि वैद्यकीय निष्काळजीपणा अधोरेखित झाला आहे. यापुढे अशा प्रकरणांमध्ये रुग्णांच्या नातेवाइकांना ग्राहक आयोगाकडे दाद मागता येईल.तक्रारदारांचे वकील ॲड. ज्ञानराज संत यांनी सांगितले की, 'विलंबाने का होईना; पण न्याय मिळाला आहे. या निकालामुळे डॉक्टरांच्या कामाच्या पद्धतीवर नियंत्रण ठेवण्यास आणि वैद्यकीय सेवेत पारदर्शकता आणण्यास मदत होईल.'

दरम्यान, आयोगाने आपल्या निष्कर्षात म्हटलं आहे की, प्रसूतीनंतर रुग्ण महिला अत्यवस्थ झाली असतानाही तिला तातडीने उच्च दर्जाच्या रुग्णालयात पाठवलं नाही. तसंच, रुग्णालय आणि डॉक्टरांनी 'डिस्चार्ज' सह इतर वैद्यकीय कागदपत्रे दीड म हिन्यानंतर दिली. ससून रुग्णालयाच्या तज्ज्ञ समितीने असा निष्कर्ष नोंदवला की, प्रसूतिपूर्वी महिला उपाशी अवस्थेत नव्हती आणि तिची श्वसननलिका सुरक्षित ठेवण्याच्या उपाययोजना केल्या नाहीत. शस्त्रक्रियेनंतर रुग्णालयातील डॉक्टरांनी अधिक दक्ष राहणं आवश्यक होतं. या सर्व बाबी वैद्यकीय निष्काळजीपणा व त्रुटीयुक्त सेवा असल्याचं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

## गर्भवती भावजयीला कुऱ्हाडीने वार करून संपवलं, दीर पुण्यात पळाला

**रायगड :** तब्बल २४ वर्षांपूर्वी ९ म हिन्यांची गर्भवती असलेल्या भावजयीची कुऱ्हाडीने निर्घृण हत्या करून पळून गेलेला आरोपी संतोष गणपत राणे याला अखेर नेरळ पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. गर्भवती महिलेच्या हत्येच्या या घटनेनं परिसरात मोठी खळबळ उडाली होती. हत्येनंतर आरोपीने आपलं नाव, ओळख आणि वास्तव्य बदलून पोलिसांना चकवा दिला होता. मात्र रायगड जिल्हा पोलिसांनी संयम, तांत्रिक चौकशी आणि गुप्त माहितीच्या आधारे त्याला अखेर पिंपरी-चिंचवड, सांगवी परिसरात शोधून काढलं आहे.मिळालेल्या माहितीनुसार, २ फेब्रुवारी २००१ रोजी पोही गावात संतोष राणेने आपल्या भाऊ अनिल राणे आणि पत्नी गुलाब राणे यांच्यातील किरकोळ वादातून रागाच्या भरात घरातून कुऱ्हाड आणली. त्याने गर्भवती भावजयीवर वार केले. या हल्ल्यात तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर आरोपी गावातून पळून गेला आणि तब्बल २४ वर्षे फरार राहिला. रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या




मार्गदर्शनाखाली नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी सहा. पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांनी आरोपीचा शोध घेतला. नातेवाईकांकडून, जुन्या धागेदोऱ्यांद्वारे आणि तांत्रिक तपासाद्वारे आरोपी सांगवी, पिंपरी-चिंचवड येथे राहत असल्याची माहिती मिळाली. आरोपी स्वतःचे नाव 'संतोष गणपत पाटील' असं सांगून केटरिंग व्यवसायात गुंतला होता.पोलीस उपनिरीक्षक भास्कर गंगाधर गच्चे, पोशि. राजाभाऊ केकाण आणि पोशि. आश्रुबा बेद्रे या विशेष पथकाने संयम, शिताफी आणि नियोजनपूर्वक कारवाई करून आरोपीला ताब्यात घेतले. प्राथमि क चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली.फरार आरोपीला अटक करून नेरळ पोलीस ठाण्यात आणण्यात आले असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नितीन मंडलीक करत आहेत.

## आधी प्रेमात पाडलं, नंतर आयुष्यातून उठवण्याचा प्रयत्न

**नंदुरबार :** नंदुरबारमध्ये एका तरुणीसोबत धक्कादायक प्रकार घडला आहे. सदर तरुणीच्या ओळखीच्या युवकाने दोन वर्षांपासून तिच्यासोबत प्रेमसंबंध निर्माण केले. तुझ्यावर खूप प्रेम आहे, असं भासवून फसवणूक करून तरुणीचा अश्लील व्हिडिओ तयार केला. त्यानंतर सोशल मीडियावर त्या युवतीचा व्हिडिओ प्रसारित केला. याप्रकरणी पीडित युवतीच्या फिर्यादीवरून दोन संशयितांना शहादा व सारंगखेडा पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. आरोपींमध्ये एक विधीसंघर्ष बालक असल्याने त्याला बाल न्याय मंडळापुढे हजर करण्यात आले.मिळालेल्या माहितीनुसार, सारंखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पीडित युवतीचे दोन वर्षांपासून तिच्या ओळखीचा हिमांशू राजेंद्र पाटील याच्यासोबत प्रेमसंबंध होते. तुझ्यावर म ाझे खूप प्रेम आहे, असं सांगून तरुणाने त्या युवतीची फसवणूक करून अश्लील व्हिडिओ तयार केला. तसंच नंतर मोहीदे येथील दोन युवकांनी सोशल मीडियावर त्या युवतीचा अश्लील व्हिडिओ प्रसारित केला होता. सदरचा व्हिडिओ रेकॉर्ड करुन तो प्रसारित करण्यात आला. याबाबत सारंगखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## सरकारी हॉस्पिटलमध्ये डॉक्टरचा तरुणीसोबत बनियनवरच डान्स

**लखनौ :** उत्तर प्रदेशातील शामली येथील सरकारी रुग्णालयात एका डॉक्टरचा एका तरुणीसोबत डान्स करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यानंतर डॉक्टरला आपत्कालीन ड्युटीवरून हटवण्यात आले आहे. या घटनेनंतर रुग्णालय प्रशासनाने त्याचे सरकारी निवासस्थानही रिकामे केले असून पुढील कारवाईसाठी या घटनेचा सविस्तर अहवाल वरिष्ठ आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला आहे.डॉ. वकार सिद्दीकी यांची नुकतीच दोन वर्षांच्या कंत्राटी करारावर नियुक्ती झाली होती. त्यांना रुग्णालयाच्या आपत्कालीन विभागात तैनात करण्यात आले होते. एका बंद खोलीत डॉक्टर एका तरुणीसोबत डान्स करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला. संबंधित तरुणी त्यांची होणारी पत्नी असल्याचे सांगितले जाते. साखरपुडा झाल्याच्या आनंदात दोघे नाचत असल्याचं बोललं जात आहे. हा व्हिडिओ गेल्या बुधवारी समोर आला आणि त्याला अल्पावधीतच मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली.वैद्यकीय अधिकारी वीरेंद्र सिंग यांनी तातडीने या प्रकरणाची दखल घेतली आणि डॉ. सिद्दीकी यांच्याकडून स्पष्टीकरण



मागवले. डॉक्टरांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने, दुसऱ्या दिवशी कठोर कारवाई सुरू करण्यात आली. डॉ. सिद्दीकी यांना आपत्कालीन ड्युटीवरून हटवण्यात आले, त्यांचे नियुक्त केलेले निवासस्थान रिकामे करण्यात आले आणि पुढील कारवाईसाठी या घटनेचा सविस्तर अहवाल वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला.या प्रकरणी शामली येथील वैद्यकीय अधिकारी वीरेंद्र सिंग यांनी भाष्य केले आहे. ङ्गअसे वर्तन अस्वीकार्य आहे आणि कोणत्याही सरकारी सेवेत ते सहन केले जाणार नाही. योग्य कारवाई करण्यात आली आहे आणि पुढील विभागीय पुनरावलोकनासाठी हा विषय वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला आहे. या घटनेमुळे रुग्णालयातील कर्मचारी आणि स्थानिक रहिवाशांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

# वाहन जाळण्याच्या संशयातून तरुणाला बेदम मारहाण, सागरचा मृत्यू

**जालना :** जालन्यात गाडी जाळण्याच्या संशयातून एका तरुणाला रॉडने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा आज उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. सागर भगवान आगलावे (वय २३) असं मृत तरुणाचं नाव आहे. मागील शनिवारी जालना शहरातील भवानीनगर भागात राहणाऱ्या सागर आगलावे यांना गाडी जाळण्याच्या संशयातून ४ ते ५ जणांनी रॉडने बेदम मारहाण केली होती. या घटनेत गंभीर जखमी झाल्याने त्यांना गंभीर अवस्थेत जालना येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान आज त्यांचा मृत्यू झाला.याप्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, जोपर्यंत आरोपींना अटक होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याचा पवित्रा मयताच्या नातेवाईकांनी घेतला आहे, असं आई रुक्मिणाबाई आगलावे आणि मामेभाऊ कृष्णा घायाळ यांनी 'महाराष्ट्र टाइम्स ऑनलाईन'शी बोलताना म्हटलं आहे. याप्रकरणी घटनास्थळी कदम जालना पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांनी जिल्हा रुग्णालयात धाव घेतली असून आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना झाली असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली आहे आणि पुढील तपास सुरू आहे.जालन्यातून एक धक्कादायक घटना समोर आलीय, शाळेच्या छतावरून आठवीत शिकणाऱ्या १३ वर्षीय विद्यार्थिनीने आज सकाळी ८ वाजेच्या सुमारास शाळेच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केलीय. सकाळीच ती नियमित शाळेत आली, शाळेची प्रार्थना झाली, सर्व मुली आपापल्या



वर्ग खोलीत गेल्या. मात्र, मयत विद्यार्थिनी प्रार्थनेनंतर तिसऱ्या मजल्यावर वर्ग खोलीकडे जाताना या खोलीबाहेरील गॅलरीमधून थेट खाली उडी मारली, सदर घटना ही शिक्षकांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ तिला खासगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आलं.सदर घटना ही वाऱ्यासारखी संपूर्ण जालना शहरात व परिसरात पसरली व पोलिसांना सुद्धा याची माहिती शाळेकडून देण्यात आली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पाहणी करत पंचनामा केला आहे. तर आत्महत्येचं कारण अद्याप अस्पष्ट असलं तरी शाळेतील मुलांच्या छेडछाडीला कंटाळून आणि शिक्षकांच्या दुर्लक्षामुळे मुलीने आत्महत्या केल्याचा आरोप तिच्या वडिलांनी केलाय. काही दिवसांपूर्वी आरोहीला शाळेतीलच काही विद्यार्थी त्रास देत होते याची तक्रार आरोहिणी शिक्षकांकडे केली होती. मात्र शिक्षकांनी तिच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केली आणि तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केलं असा आरोप आरोहीच्या वडिलांनी केला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सुपरकॅच... आपल्या बॉलिंगवर मिचेल स्टार्कची भन्नाट कॅच पाहून सर्वांनाच बसला धक्का...

**पर्थ :** ऑस्ट्रेलियाने सामना जिंकला खरा, पण तरीही जगभरात सर्वात जास्त चर्चा सुरु झाली आहे ती मिचेल स्टार्कच्या एका 'सुपरकॅच'ची. कारण अशी कॅच कोणालाही पकडता येणार नाही, असेच त्याचा व्हिडिओ पाहून समजते आहे. कारण स्टार्कने अप्रतिमपणे ही कॅच पकडली आहे. त्यामुळे या कॅचची जगभरात चर्चा सुरु असून व्हिडिओ क्रिकेट विश्वात जोरदार व्हायरल झाला आहे.ही गोष्ट घडल ती दुसऱ्या डावात. इंग्लंडचा दुसरा डाव सुरु झाला होता. मिचेल स्टार्क यावेळी पहिले षटक घेऊन आला होता.स्टार्कने पहिल्या डावात अचूक मारा करत इंग्लंडची भंबेरी उडवली




होती. त्यामुळे आता दुसऱ्या डावात स्टार्क कशी गोलंदाजी करतो, हे सर्वांना पाहायचे होते. पण स्टार्क एवढी प्रोफोशन खेळाडू आहे की, पहिल्या चेंडूपासून तो लयीत आलेला असतो. यशस्वी जयस्वालला त्याने असेच पहिल्या चेंडूवर आऊट केले होते. त्यावेळीही स्टार्कच्या गोलंदाजीची चर्चा झाली होती आणि आता पुन्हा एकदा पहिल्या षटकात आपल्याच गोलंदाजीवर कॅच पकडत स्टार्कने सर्वांची मनं जिंकली आहेत.र्कचा पहिल्याच षटकात सामना करत होता. पहिले चारही चेंडू स्टार्कने अचूक टाकले होते. पण पाचवा चेंडू क्राऊलीच्या बॅटवर चांगलाच आला होता.

क्राऊलीने यावेळी क्रिकेटमधील सर्वात स्टाइलिश फटका म्हणजे स्ट्रेट ड्राइव्ह मारला होता. स्टम्पच्या बाजूने हा चेंडू थेट चौकार जाईल, असे वाटत होते. पण स्टार्कने यावेळी केले ते कोणत्याही गोलंदाजाला जमणार नाही. कारण वेगवान गोलंदाजाला आपल्या बॉलिंग अशी कॅच घेणे सर्वात कठीण असते आणि तेच स्टार्कने करून दाखवले आहे. स्टार्कने चेंडू टाकल्यावर यावेळी आपल्या डाव्या बाजूला उडी मारली आणि अफलातून झेल पकडल्याचे यावेळी पाहायला मिळाले. स्टार्कने कॅच पकडली आहे, यावर कोणालाही विश्वास बसत नव्हता. पण जेव्हा स्टार्कने कॅच पूर्ण केली तेव्हा सर्वांनाच मोठा धक्का बसला. मिचेल स्टार्कने या सामन्यात १० बळी मिळवले आणि ऑस्ट्रेलियाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला.

## सूर्यकुमार यादव संघात असतानाही शार्दुल ठाकूरकडे कर्णधार पद

**लखनौ :**सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली टी २० संघाने आतापर्यंत दमदार काम गिरी केली आहे. सूर्याच्या नेतृत्वाखाली संघाचे एकही मालिका गमावलेली नाही. पण तरीही सूर्यकुमार यादवला संघाचे कर्णधारपद देण्यात आलेले नाही. मुंबईच्या संघाचे कर्णधारपद आता शार्दुल ठाकूरकडे सोपवण्यात आले आहे. सूर्यकुमार यादव संघात असतानाही शार्दुल ठाकूरला का कर्णधारपद देण्यात आले, याचे कारणही आता समोर आले आहे.मुश्ताक अली टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी शार्दूल ठाकूरकडेच मुंबई संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवचाही या संघात समावेश आहे; मात्र सूर्या संपूर्ण स्पर्धेस उपलब्ध नसल्यामुळे शार्दूलकडेच नेतृत्व कायम ठेवण्याचा निर्णय मुंबई क्रिकेट संघटनेच्या निवड समितीने घेतला. शार्दूलच्या नेतृत्वाखाली मुंबईने रणजी मोसमात




चांगली सुरुवात केली आहे. संपूर्ण स्पर्धेसाठी उपलब्ध असलेल्या खेळाडूंतूनच कर्णधाराची निवड करणे योग्य होईल, हा विचार करून शार्दूलची निवड केली आहे, असे मुंबई क्रिकेट संघटनेच्या वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष संजय पाटील यांनी सांगितले. निवडलेल्या संघात सूर्याप्रमाणेच राष्ट्रीय संघातून खेळणाऱ्या शिवम दुबेचाही समावेश आहे.अजिंक्य रहाणे, सिद्धेश लाड, सर्फराझ खान या अनुभवी खेळाडूंनाही या संघात स्थान देण्यात आले आहे. रहाणेने गतमोसमात नऊ टी-२० सामन्यांत ५८.६२च्या सरासरीने; तसेच १६४.५६च्या स्ट्राइक रेटने ४६९ धावा केल्या होत्या.

## रोहितने गौतम गंभीर यांची बोलतीच बंद केली

**मुंबई :** गौतम गंभीर यांनी रोहित शर्माला संघाबाहेर करण्याचा प्लॅन बनवला होता, असे म्हटले जात होते. पण रोहित शर्माने आता गंभीर यांची बोलतीच बंद केली आहे. कारण रोहित शर्माचा एक फोटो आता जोरदार व्हायरल होत आहे. त्यामुळे रोहित शर्माने आता गौतम गंभीर दात घशात टाकल्याचे समोर आले आहे.गौतम गंभीर प्रशिक्षक झाल्यावर त्यांनी रोहित शर्मावर एवढा राग का काढला, हे अद्याप कोणालाही समजू शकलेले नाही. सुरुवातीला त्यांनी त्यांच्याकडून कसोटी कर्णधारपद काढून घेतले. त्यानंतर त्याला कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती द्यायला भाग पाडले. यापूर्वी रोहितने टी २० क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेली होती. त्यामुळे आता रोहित फक्त भारताकडून वनडे क्रिकेटच खेळू शकतो, हे स्पष्ट झाले होते. पण त्यानंतरही गंभीर काही शांत बसले नाहीत. रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. पण त्यानंतर गंभीर यांनी रोहितकडून वनडे संघाचेही कर्णधारपद काढून घेतले. गंभीर एवढ्यावरही थांबले नाहीत.रोहितकडे वनडे संघाचेही कर्णधारपद नसल्यामुळे तो फक्त एक खेळाडू म्हणून संघात राहीला. आगामी २०२७ साली होणारा वनडे वर्ल्ड कप खेळण्याचे रोहित शर्माचे स्वप्न असल्याचे समोर आले. पण त्यानंतर गंभीर यांनी सांगितले की, एवढ्या लांबचा विचार मी करणार नाही, त्यापूर्वीच संघात काही बदल केले जातील. गंभीर यांनी यावेळी रोहित शर्माच्या फिटनेसबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. हे सारं बोलून गंभीर यांनी रोहित शर्मा याला वनडे संघाबाहेर काढण्याची वॉर्निंगही दिली होती. पण रोहितने आता गंभीर यांना काहीही न बोलता




चोख उत्तर दिलेले आहे.

रोहित शर्मा हा अर्ध्या हळकुंडाने पिवळा झालेला क्रिकेटपटू नाही. आपल्याला नेमकं काय कधी करायचं, हे त्याला चांगलेच माहिती आहे. ऑस्ट्रेलियातील वनडे मालिकेत रोहित शर्माने सर्वाधिक धावा केल्या होत्या. पण तरीही त्याच्या फिटनेसवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. पण आता रोहित शर्मावर त्यावरही तोडगा काढला आहे. रोहित शर्माचा एक नवा कोरा फोटो चांगलाच व्हायरल झाला आहे. या फोटोमध्ये रोहित शर्मा हा किती फिट आहे, हे दिसत आहे. काही दिवसांपूर्वी रोहितचे पोट सुटलेले दिसत होते. पण या फोटोमध्ये मात्र रोहित शर्माचे पोट भरपूर आतमध्ये आलेले दिसत आहे. त्यामुळे आपण अजून दोन वर्षेतरी क्रिकेट खेळू शकतो, हे रोहितने दाखवून दिले आहे. रोहित शर्माचा नवीन फोटो जोरदार व्हायरल झाला आहे आणि चाहते त्याच्यावर भारी खूष झाल्याचे दिसत आहे.



## ऋषभ पंतची धोनी स्टाइल कॅप्टन्सी, मॅचविनर टेंबा बवुमाची कशी काढली विकेट

**गुवाहाटी :** ऋषभ पंतला दुसरा महेंद्रसिंग धोनी उगाच म्हटले जात नाही. या गोष्टीचा प्रत्यय दुसऱ्या कसोटी सामन्यातही आला. ऋषभ पंतकडे हंगामी कर्णधारपद देण्यात आले आहे. त्यामुळे या सामन्यात पंतकडून दमदार कॅप्टन्सी पाहायला मिळाली. पहिल्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेंबा बवुमा हा मॅचविनर ठरला होता. टेंबाने आपल्या फलंदाजीच्या जोरावर एकट्याने मॅच काढली होती. पण या दुसऱ्या सामन्यात ऋषभ पंतने धोनीच्या स्टाइलने त्याा बाद केले. या गोष्टीचा व्हिडिओ आता जोरदार व्हायरल झाला आहे.भारताच्या गोलंदाजांनी टेंहा बवुमाचा चांगलाच धसका घेतला होता. कारण पहिल्या सामन्यात जिथे कोणताही फलंदाजी खेळपट्टीवर जास्त काळ तग धरत नव्हता, तिथे त्यावे अर्धशतक झळकावले होते. समर्थपणे त्याने भारताच्या गोलंदाजांच्या पहिल्या सामन्यात सामना केला होता. दुसऱ्या सामन्यातही तो फलंदाजीला आला तेव्हा तो आश्वासक दिसत होता. एका टेंबा बवुमा खेळायला लागला की, तो मोठी खेळी साकारतो, हे सर्वांनाच माहिती आहे. या दुसऱ्या सामन्यातही टेंबा अर्धशतकाच्या जवळ आला होता. काही वेळातच तो आपले अर्धशतक झळकावेल, असे त्याच्या फलंदाजीकडे पाहून वाटत होते. पण त्याचवेळी ऋषभ पंतने एक युक्ती केली आणि आपल्या जाळ्यात टेंबा बवुमाला फासण्यासाठी रणनिती आखली.ऋषभ पंतने जेव्हा टेंबा खेळायला आला, तेव्हा त्याला मोठे फटके मारून धावा काढण्यासाठी प्रवृत्त केले. यावेळी पंत म्हणाला की, ' टेंबा आता फलंदाजीला आला आहे. त्याला जर बाद करायचे असेल तर त्याला मोठा फटका मारण्यासाठी प्रवृत्त करा, तरच तो बाद होऊ शकतो. त्यासाठी फिल्डींगही तशीच लावली आहे. फक्त त्याला मोठा फटका मारण्यासाठी प्रवृत्त करा. 'रवींद्र जडेजासारख्या अनुभवी खेळाडूने ही गोष्ट ऐकली आणि त्याने टेंबाला पुढे येऊन मोठा फटका मारण्यासाठी प्रवृत्त केले.यावेळी पंतच्या जाळ्यात टेंबा फसल्याचे पाहायला मिळाले. कारण टेंबा यावेळी मोठा फटका मारण्यासाठी गेला आणि आपली विकेट देऊन फसला. त्यामुळे धोनीच्या स्टाइलसारखी विकेट यावेळी पंतने मिळवल्याचे म्हटले गेले आहे. ऋषभ पंतने या सामन्यात चांगले नेतृत्व केले, त्यामुळेच दक्षिण आफ्रिकेच्या एकाही खेळाडूला अर्ह्नशतक पूर्ण करता आले नाही.

# कॉमेडियन कपिल शर्माच्या कॅफेवर तिऱ्यांदा गोळीबार

## लॉरेन्स बिश्नोई गँगने घेतली जबाबदारी

**मुंबई :** कॅनडामध्ये लॉरेन्स बिश्नोई गँगने पुन्हा कॉमेडियन कपिल शर्माच्या कॅप्स कॅफेवर गोळीबार केला. कॅनडा सरकारने जेव्हापासून या गँगला दहशतवादी संघटना संबोधले आहे, तेव्हापासून सातत्याने या घटना होत आहेत. लॉरेन्स बिश्नोई गँगने या गोळीबाराची जबाबदारी घेतलीय. कॅनडामध्ये विविध ठिकाणी गोळीबार गँगकडून होत असून आताचा गोळीबार कॅनडा ब्रॅम्पटन (इीरांपि) परिसरात झाला.


कॅनडामध्ये लॉरेन्स बिश्नोई गँगने पुन्हा एकदा कॉमेडियन कपिल शर्माच्या कॅफेवर गोळीबार केला. १६ ऑक्टोबर रोजी सकाळी कपिल शर्माच्या कॅफेवर गोळीबार झाला आणि त्याच दिवशी सायंकाळी एका बिजनेसमॅनच्या हवेलीवर देखील गोळीबार झाला. सोशल मीडियावर या गोळीबाराची जबाबदारी त्या गँगस्टर्स गोल्डी ढिल्लनने घेतली आहे. कपिल शर्माच्या कॅफ `वर पहिल्या हल्ल्याची जबाबदारी त्यांनीच घेतली होती. या गोळीबाराच्या घटनेचा एक व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. कॅफेवर ९-१० गोळ्या झाडण्यात आल्या. त्या कॅफेच्या भिंतीवर काचेच्या तुकडे आणि बुलेट होल्स झाले आहे.

या गोळीबारात कोणीही जखमी किंवा जीवित हानी झाली नाही. कॅनडा सरकारने जेव्हापासून लॉरेन्स बिश्नोई गँगला दहशतवादी संघटना जाहिर केले आहे, तेव्हापासून कॅनडामध्ये विविध ठिकाणी गोळीबार या गँगकडून होत आहे.

लॉरेन्स बिश्नोई गँग कडून गोळीबाराच्या या घटनेबद्दल गोल्डी ढिल्लोने सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिलं, 'सत श्री अकाल... मी गोल्डी ढिल्लो, लॉरेन्स बिश्नोई गँगमधून आहे. जमीनदार बार अँड ग्रिल (२९५ क्वीन स्ट्रीट ई, ब्रॅम्पटन) मध्ये जे शूटिंग झाले, त्याची जबाबदारी मी घेतो. याचा आमच्या पैशांशी कोणताही वाद नव्हता. फक्त त्याला थोडी अद्दल घडवायची होती. आता तर केवळ ट्रेलर आहे, चित्रपटात जीव देखील जाऊ शकतो. जर कुणी आदर करू शकत नसेल.'





# 'कांतारा: चॅप्टर १' ने उडवला बॉक्स ऑफिसचा बार; होम्बले फिल्म्सचा विक्रम



**मुंबई :** होम्बले फिल्म्स आणि ऋषभ शेट्टीचा 'कांतारा: चॅप्टर १' ने जगभरात चित्रपटगृहात धुमाकूळ घातला आहे. २०२२ मध्ये रिलीज झालेला ब्लॉकबस्टर चित्रपट कांताराच्या या प्रीक्वलने प्रेक्षकांची मने जिंकली आहे. दमदार अभिनयाने सजलेल्या चित्रपटाची कहाणी प्रेक्षकांना खुर्चीवर खिळवून ठेवणारी आहे. मंत्रमुग्ध करणारी दृश्ये, प्रभावी डायलॉग्ज आणि सुपर डायरेक्शनने सर्वांना वेड लावलं आहे. बॉक्स ऑफिसवर कोटींचे कलेक्शन करणाऱ्या या चित्रपटाने रिलीजच्या केवळ दोन आठवड्यातच जगभरात ७१७.५० कोटींची रेकॉर्डतोड कमाई केली आहे. आता प्री-दिवाळी वीकेंडमध्ये देखील धमाकेदार कमाई करण्यासाठी हा चित्रपट तयार आहे. त्याचबरोबक दिवाळीच्या सुट्ट्यांचा भरपूर फायदा चित्रपटाला होणार आहे. निर्मात्यांनी सोशल मीडियावर लिहिलं- बॉक्स ऑफिसवर एक दिव्य तुफान KantaraChapter1 जगभरात ७१७.५० कोटींचे ऋजउ पार केले आहे. या दिवाळीत BlockbusterKantara सोबत उत्सव साजरा करा...' चित्रपटात ऋषभ शेट्टी, सप्तमी गौडा, गुलशन देवैया, रुक्मिणी वसंत, जयराम, पीडी सतीश चंद्र, प्रकाश थुमिनाड आणि अन्य प्रतिभाशाली कलाकारांच्या भूमिका आहेत. चित्रपटाची कथा, दिग्दर्शन आणि मुख्य भूमिका ऋषभ शेट्टीची आहे. हा चित्रपट विजय किरागंदूर द्वारा होम्बले फिल्म्सच्या बॅनर अंतर्गत निर्मित आहे. सिनेमॅटोग्राफी अरविंद एस. कश्यपने केली आहे.

# बॉलीवूड सोडणाऱ्या अभिनेत्री झायरा वसीमने केलं लग्न!




**मुंबई :** इस्लाम धर्मासाठी बॉलीवूड सोडणारी अभिनेत्री झायरा वसीम हिने लग्न केलं आहे. 'दंगल' फेम झायला वसीमने इन्स्टाग्रामवर दोन फोटो शेअर करून लग्न केल्याची माहिती चाहत्यांबरोबर शेअर केली. झायराची ही पोस्ट चांगलीच व्हायरल झाली असून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होतोय.



झायराने इन्स्टाग्रामवर दोन फोटो पोस्ट केले आहेत. एका फोटोत ती निकाहनाम्यावर सही करतेय. तर दुसरा फोटो तिच्या पतीबरोबरचा आहे. या फोटोत ती व तिचा पती चंद्राकडे बघत आहेत. हा त्यांचा पाठमोरा फोटो आहे. झायरा व तिचा पती दोघांचाही चेहरा यात दिसत नाही. झायरा वसीमने हे फोटो शेअर करताना छोटसं कॅप्शन दिलं आहे. कॅप्शनमध्ये तिने मोजकेच शब्द लिहिले आहे. Qubool hai x3 असं लिहून झायरा वसीम ने ही पोस्ट केली आहे. तिच्या पोस्टवर चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. आयुष्यातील नवीन प्रवासासाठी तिला चाहते शुभेच्छा देत आहेत.

## झुबीन गर्ग मृत्यूप्रकरणात त्यांच्या बँडमधील दोन सदस्यांना कोठडी

**मुंबई :** गायक झुबीन गर्ग यांचे सप्टेंबर महिन्यात सिंगापूरमध्ये निधन झाले. झुबीन यांच्या मृत्यूप्रकरणी १४ दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर, झुबीन गर्गच्या दोन बँड सदस्य शेखर ज्योती गोस्वामी आणि अमृतप्रवा महंता यांना शुक्रवारी न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले.



कामरूप येथील मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी या दोघांना न्यायालयीन कोठडी सुनावली. दोघांना आधी न्यायालयात आणण्यात आलं आणि नंतर वेगवेगळ्या पोलीस व्हॅनमधून नेण्यात आले. त्यांना १४ दिवसांनी पुन्हा न्यायालयात हजर केलं जाईल. झुबीन गर्ग यांच्या मृत्यूप्रकरणातील इतर पाच आरोपींना बुधवारी न्यायालयीन कोठडीत पाठवल्यानंतर बक्सा जिल्हा कारागृहाबाहेर हिंसाचार झाला. त्यामुळे या दोघांना कोणत्या तुरुंगात ठेवलं जाईल याबद्दल अधिकाऱ्यांनी कोणतीच माहिती दिलेली नाही. एसआयटीने बऱ्याच दिवसांच्या चौकशीनंतर गोस्वामी व महंता दोघांनाही ३ ऑक्टोबर रोजी अटक केली होती. त्यानंतर त्यांना १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. दरम्यान, आसाम सरकारने सिंगापूरमध्ये झुबीन गर्ग यांच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी १० सदस्यांची एसआयटी स्थापन केली होती. आतापर्यंत राज्यभरातून महंता, शर्मा व इतरांविरोधात ६० हून जास्त एफआयआर दाखल करण्यात आल्या आहेत. यानंतर मुख्यमंत्र्यांनी डीजीपींना या सर्व तक्रारी सीआयडीकडे सोपवण्याचे व सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले.

# अभिनेता खेसारी लाल यादव उतरणार बिहार निवडणुकीच्या रिंगणात..!



**पटणा :** भोजपुरी अभिनेता खेसारी लाल यादव बिहार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरत आहे. ते छपरातून आरजेडीसाठी निवडणूक लढतील. ते आज अर्ज दाखल करणार असून सोशल मीडियाच्या म ाध्यमातून फॅन्सना माहिती दिलीय. भोजपुरी सुपरस्टार खेसारी लाल यादव चित्रपटानंतर आता राजकारणात आपले नशीब आजमावणार आहेत. त्यांनी फॅन्सकडे प्रार्थना करण्याचे आवाहन केले आहे.

खेसारी लाल यादवने गुरुवारी रात्री जाहीर केले होते की, ते निवडणूक सत्तेसाठी लढणार नाही तर ते जनतेचे पुत्र आहेत आणि राजकारणाला आपली जबाबदारी मानतात. खेसारी आता रिंगणात उतरणार म्हटल्यावर सगळीकडे चर्चेचा विषय सुरु आहे. आधी पवन सिंह निवडणूक लढण्यासाठी समोर आले होते. परंतु, खासगी कारणामुळे ते निवडणुकीच्या मैदानात उतरले नाहीत.

खेसारी म्हणाले, 'मी माझा अर्ज दाखल करत आहे आणि या औचित्याने तुमचा सर्वांचा आशीर्वाद, पाठिंबा माझ्यासाठी मोठे आहे. मनापासून आपल्या सर्वांना विनंती आहे की, नामांकना दिवशी या, तुमच्या म ुलाला आणि भावाला आशीर्वाद द्या. आम्ही तुमचा हक्क आणि सम्मानाची लढाई आणखी दृढपणे लढू शकू.' भोजपुरी इंडस्ट्रीत खेसारी लाल यादव यांचे फॅन फॉलोईंग खूप अधिक आहेत. सोशल मीडियावर ६.५ मिलियनच्या जवळपास फॉलोअर्स आहेत. त्यांचा अभिनय आणि गाण्याचे लोक वेडे आहेत. खेसारी जेव्हा मैदानात उतरतील, तेव्हा राजकीय वर्तुळात खूप चर्चा रंगणार आहे. याआधी मनोज तिवारी, रवि किशन यासारखे स्टार्सनी राजकारणात आपले नशीब आजमावले आहे. ज्यामध्ये त्यांना यशही मिळाले आहे. आता खेसारी लाल यादव यांचे नशीब किती चमकते, हे पाहणं रंजक ठरेल.

# शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथराव शिंदे यांचे हात मजबूत करण्यासाठी नगरपालिकेत शिवसेनेचे शिलेदार निवडून आणा. हीच माझ्यासाठी वाढदिवसाची भेट...केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव

## दुष्काळी परिस्थितीमुळे वाढदिवस साजरा न करण्याचा घेतला निर्णय होल्डिंग डिजिटल बॅनर न लावण्याचे शिवसैनिकांना केले आवाहन ...

**जनसंचलन/बुलढाणा**

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता होल्डिंग , डिजिटल बॅनर जाहिरातीवर खर्च न करता मला वाढदिवसाची भेट द्यायची असेल तर शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथराव शिदे यांचे हात बळकट करण्यासाठी नगरपालिकेवर भगवा फडकवा आणि नगराध्यक्षासह जास्त संख्यने नगरसेवक निवडून आणा असं भावनिक आवाहन शिवसेना नेते तथा केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी शिवसैनिकांना केले आहे ... शिवसेना नेते तथा केंद्रीय आयुष ,आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा वाढदिवस २५ नोव्हेंबरला जिल्हाभरात विविध कार्यक्रमाव्दारे शिवसैनिक साजरे करतात .शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या वतीने जिल्हाभर डिजिटल होल्डिंग , जाहिरात बॅनर आणि सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून दरवर्षी भुमिपुत्रांचा वाढदिवस साजरा केला जातो . पण यावर्षी जून ते ऑक्टोबर पर्यंत जिल्हाभरात ठिकठिकाणी अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं शेतकरी हवालदिल झालेला असतानाच शेतकऱ्यांना शासनातर्फे आर्थिक मदत मिळावी यासाठी जिल्ह्याचे खासदार भूमिपुत्र प्रतापराव जाधव यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आणि जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्याला मदत मिळावी यासाठी प्रयत्न केलेत . त्यांच्या प्रयत्नांना यशही आले आणि संपूर्ण जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर झाला. यावर्षी अतिवृष्टीमुळे रब्बी आणि खरीप पीक शेतकऱ्यांच्या हातून गेले अतिवृष्टी जाहीर झाली अशा वातावरणामध्ये वाढदिवस साजरा करणे योग्य नाही अशी भावना भूमिपुत्र केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली माझ्या वाढदिवसानिमित्त होल्डिंग डिजिटल जाहिरात बॅनर वर खर्च न करता शिवसैनिकांनी येणाऱ्या नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये नगरपालिकेवर भगवा फडकवा आणि जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणावेत आणि शिवसेना पक्ष नेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे हात बळकट करावे हीच माझ्यासाठी वाढदिवसाची भेट राहील . तेव्हा शिवसेनेचे शिलेदार नगरपालिकेत निवडून



देण्यासाठी प्रयत्न करावेत सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करावा असे आवाहन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचा जनसंपर्क कार्यालयातून शिवसेनिकांना करण्यात आले आहे.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |


आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# गोंधनखेड शिवारात अडीच किलो गांजा जप्त!

**जनसंचलन/बुलढाणा**

हद्दीत गोंधनखेड शिवारात रविवारी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दुचाकीस्वाराकडून २ किलो ५० ग्रॅम गांजा जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक बुलढाणा उपविभागात पेट्रोलिंग करत असताना गोंधनखेड शिवारात गणेश मेरसिंग साबळे, वय ४२, रा. तरोडा, ता. मोताळा हा संशयास्पद हालचाली करताना दिसून आला. त्याच्या दुचाकीला नायलॉनची थैली होती. पथकाने पंचासमक्ष त्याची झडती घेतली. त्याच्या थैलीत हिरवट, काळसर, कळीदार बिजा असलेला ४१ हजार रुपये किंमतीचा गांजा अंमली पदार्थ तसेच खिशात एक मोबाइल आढळून आला. पोलिसांनी गांजा, मोबाइल व दुचाकी क्रमांक एम.एच. २८ ए.के.१८९१ असा एकूण ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस उपनिरीक्षक अविनाश जायभाये, पोहेकॉ दीपक लेकुरवाळे, विजय पैठणे, सुनील मिसाळ आदींच्या पथकाने केली.



# गाफील राहू नका, रात्र वैऱ्याची आहे, निवडणूक शेवटची...; राज ठाकरेंचं आगामी निवडणुकीवर मोठं विधान

वृत्तसंस्था/मुंबई

सध्या राजकारणामध्ये खूप मोठ्या घडामोडी घडत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचं बिगुल वाजल्यापासून राज्यात राजकारणातल्या घडामोडींनी प्रचंड वेग प्राप्त केला आहे. खूप मोठ्या विलंबानंतर या निवडणुका होत असल्याने प्रत्येक पक्षाच्या उमेदवारांमध्ये उत्सुकता वाढलेली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची आणि माघारी घेण्याची मुदत संपलेली आहे. आता प्रचारसभा सुरु झाल्या आहेत आणि प्रत्यक्ष मतदान आणि निकाल या दोनच गोष्टी शिल्लक आहेत. दरम्यान, याच लगबगीदरम्यान, येणारी मुंबई महापालिकेची निवडणूक ही शेवटची ठरेन, जर आपण गाफील राहिलो तर ही मुंबई हातातून गेली म्हणून समजा, असं वक्तव्य मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी केलं आहे. ते कोकण महोत्सव या कार्यक्रमात बोलत होते. ते म्हणाले की मला आज फक्त एकच गोष्ट सांगायची आहे की रात्र वैऱ्याची आहे. त्यामुळे कोणीही गाफील राहू नये. आपल्या आजूबाजूला लक्ष ठेवा. आता ज्या प्रकारचे राजकारण सुरु आहे, मुंबईवर ज्याप्रकारे डोळा ठेवला जात आहे, मतदार याद्यांच्या माध्यमातून जे राजकारण सुरु आहे, त्यावर तुम्ही लक्ष ठेवा, अस राज ठाकरे म्हणाले आहेत. आपल्या आजूबाजूला कोण मतदार आहेत. ते खरे आहत की खोटे, यावरही तुमचं लक्ष असणं गरजेचं आहे. मी आज मराठी माणसांनासाठी म्हणून एकच गोष्ट सांगतो, येणारी मुंबई महापालिकेची निवडणूक ही शेवटची महापालिकेची निवडणूक असेल. जर आपण गाफील राहिलो तर निवडणूक हातातून गेली समजा. मग त्यानंतर या लोकांचे जे थैमान सुरु होतील ते कोणालाही आवरता येणार नाहीत, त्यामुळे तुम्हाला मला एकच विनंती करायती आहे की, तुम्ही कुठेही गाफील राहू नका, असं राज ठाकरे यावेळी म्हणाले आहेत. दरम्यान, आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधू राज आणि उद्धव यांची युती होणार असण्याची



दाट शक्यता मानली जात आहे. दोन्ही पक्षांमध्ये जागावाटपावर चर्चाही सुरु असल्याची माहिती आहे. राज यांनी यावेळी मनसैनिकांना निवडणुकीच्या तयारीला लागण्याचेही आदेश दिले आहेत. मतदारयाद्यांवरुन त्यांनी निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे.

## शेतात लोंबकळलेल्या वीज तारेच्या स्पर्शाने शेतकऱ्याचा मृत्यू



जनसंचलन/ डोणगाव

ग्राम जवळच असलेल्या अंजनी बु, मध्ये २२ नोव्हेंबर रोजी एक दुर्दैवी घटना घडली. शेतात लोंबकळलेल्या विद्युत तारेला धक्का लागल्यामुळे ६५ वर्षीय शेतकरी बाळकृष्ण राजाराम खोडवे यांचा मृत्यू झाला. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, अंजनी बु शिवारातील गट क्र. ५०८ मधील शेतात ते एकटे होते आणि स्प्रिंकलरचे पाइप व तोटी बदलत असताना शेतात लोंबकळलेल्या वीजतारेचा शॉक लागून त्यांचा मृत्यू झाला. मृत शेतकऱ्याचे नातेवाईक, पुतण्या नोव्हेंबर रोजी स्प्रिंकलर पाइप बदलताना घटना रामेश्वर पांडुरंग खोडवे यांनी घटनास्थळावरून तातडीने माहिती देत डोणगाव पोलिस ठाण्यात मृत्यूची नोंद दाखल केली. या प्रकरणी पोलिस निरीक्षक संजय धिके पुढील तपास करीत आहेत. डोणगाव परिसरात विद्युत वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे ही दुर्घटना घडली असल्याचा आरोप नातेवाइकांनी केला. अनेक ठिकाणी लोंबकळलेल्या विद्युत तारा, उघडे रोहित्र यामुळे धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. स्थानिकांनी या घटनेनंतर महावितरण कंपनीकडे तातडीने घेण्याची खबरदारी मागणी केली आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असून, मृताच्या कुटुंबाला आवश्यक ती मदत देण्याचे आदेश दिले आहेत. ही घटना शेतकरी व विद्युत सुरक्षेच्या गंभीर समस्येची जाणीव करून देते. अशा प्रकारचा अनर्थ टाळण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत अशी मागणी करण्यात आली




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८